दाखल तारीख : १५.१०.२०२२
नोंदणी तारीख : १५.१०.२०२२
निकाल तारीख : ०६.०७.२०२४
कालावधी : ०१ वर्ष ०८ महिने २२ दिवस

**( भाग – अ )**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, २ रे न्यायालय, अमळनेर**

**( पिठासिन अधिकारी श्रीमती. एस. एस. जोंधळे )**

**तारीख : ०६.०७.२०२४**

**नियमित फौजदारी खटला क्र. ३६३/२०२२** **निशाणी क्र. १५**

**सी.एन.आर.क्र. एम.एच.जे.जी. ०३०० १२२६ २०२२**

**(अमळनेर पोलीस स्टेशन गुन्हा क्र. ४१७/२०२२)**

| | | |
|---|---|---|
| सरकार पक्ष | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>अमळनेर पोलीस स्टेशन ता. अमळनेर जि. जळगांव |
| सरकार तर्फे वकिल | : | श्री. व्ही. डी. मोतीवाले,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| आरोपी पक्ष | : | अर्जुन ऊर्फ जय रमेश पारधी,<br>वय २६ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. पारधीवाडा, गांधलीपुरा, अमळनेर<br>ता. अमळनेर जि. जळगांव |
| आरोपी पक्षा तर्फे वकिल | : | श्री. पी.ए. पाटील |

# ( भाग – ब )

| | | |
|---|---|---|
| घटनेची तारीख | : | दिनांक ३१.०८.२०२२ रोजी दुपारी २.०० ते रात्री ८.०० वाजेचे दरम्यान, अमळनेर शहरात नगर परिषद शाळा क्र. १ चे आवारात |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | : | ०२.०९.२०२२ |
| दोषारोप पत्राची तारीख | : | १५.१०.२०२२ |
| पुराव्याला लागल्याची तारीख | : | ११.०८.२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | – |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०६.०७.२०२४ |
| शिक्षा दिली असल्याची त्याची तारीख | : | – |

## आरोपीची माहिती

| अ. नं. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष अथवा दोषी | दिलेली शिक्षा | Set off कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अर्जुन ऊर्फ जय रमेश पारधी | ०५.०९.२०२२ | ०६.०९.२०२२ | ३७९ | निर्दोष | – | – |

# ( भाग – क )

## सरकार पक्षाचे साक्षीदारांची यादी

| रँक | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. १ | जयकि शिवदास चव्हाण | फिर्यादी |

## सरकार पक्ष/आरोपी पक्ष/ कोर्टा तर्फे निशाणी देण्यात आले संदर्भात यादी

### अ – सरकार पक्ष

| अ.नं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

### ब – आरोपी पक्ष

| अ.नं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

### क – न्यायालय

| अ.नं. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

### ड – मुद्देमाल

| अ.नं. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय

**( दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी अधिघोषित )**

**०१.** सदर खटल्यात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

## अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे आहे :–

**०२.** दिनांक ३१.०८.२०२२ रोजी दुपारी २.०० ते रात्री ८.०० वाजेचे दरम्यान, अमळनेर शहरातील शाळा क्र. १ चे आवारात लावलेली फिर्यादी जयकी शिवदास चव्हाण याचे मालकीची २०,०००/– रुपये किंमतीची बजाज बॉक्सर कंपनीची मोटार सायकल क्र. MH-19/N-4846, चेचिस नं. DFFBFM90380, इंजिन नं. DFMBFM35349 हि कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून लबाडीने चोरुन नेली. करीता फिर्यादीने सदरची फिर्याद दिली.

**०३.** सदरील फिर्यादीवरुन ठाणे अंमलदाराने गुन्हा क्र. ४१७/२०२२ नोंदवून त्याचा तपास सफौ विलास अर्जुन पाटील यांना सोपविला. त्यांनी गुन्ह्याचा सखोल तपास केला, तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये दोषारोप पत्र या न्यायालयात दाखल केले.

**०४.** सदर प्रकरणातील आरोपी हजर झाल्यानंतर निशाणी क्र. १० वर आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये दोषारोप निश्चित करुन दोषारोप पत्रातील मजकूर आरोपींना त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला, त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची विनंती केली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वयचे निवेदन वगळण्यात आले.

**०५.** अभियोग पक्षाचे कथन, साक्षीदारांची साक्ष, दाखल झालेले दस्तावेज, आरोपीचा बचाव आणि दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले व त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ३१.०८.२०२२ रोजी दुपारी २.०० ते रात्री ८.०० वाजेचे दरम्यान, अमळनेर शहरातील शाळा क्र. १ चे आवारात लावलेली फिर्यादी जयकी शिवदास चव्हाण याचे मालकीची २०,०००/– रुपये किंमतीची बजाज बॉक्सर कंपनीची लाल रंगाची मोटार सायकल क्र. MH-19/N-4846, चेचिस नं. DFFBFM90380, इंजिन नं. DFMBFM35349 हि आरोपीने चोरुन नेली काय आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये गुन्हा केला काय ? | **..... नाही .....** |
| **०२.** | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**०६.** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीची साक्ष निशाणी क्र. १२ नोंदविण्यात आली. मुळ फिर्यादी यांनी अभियोगपक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे इतर साक्षीदारांना तपासून काहीही निष्पन्न होऊ शकणार नव्हते. म्हणून निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द सकृतदर्शनी पुरावा मिळून न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे निवेदन वगळण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

## <u>मुद्दा क्र.१ करीता</u>

**०७.** आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ नुसार गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास सिध्द करावे लागेल की, आरोपीने फिर्यादीचे मालकीची २०,०००/– रुपये किंमतीची मोटार सायकल चोरुन नेली. त्या अनुषंगाने अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन करणे योग्य राहील.

**०८.** साक्षीदार क्र. १ फिर्यादी याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, अंदाजे एक वर्षापुर्वी गणेशमुर्ती विक्रीच्या दुकानामागे त्याची मोटार सायकल दुपारी त्याने लावली होती, विक्रीचे काम आटोपल्यानंतर तो दुकान बंद करुन त्याची गाडी त्या ठिकाणी मिळून आली नाही, त्यामुळे त्याने गाडी चोरी गेले बाबत पोलीस स्टेशनला अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दिली होती असे सांगीतले. सदर साक्षीदार हा त्याच्या पुर्वीच्या जबाबापासुन फितूर झाल्यामुळे त्याला सरकारी वकीलांनी उत्तर सूचक प्रश्न विचारुन देखिल अभियोगपक्षास पुरक असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आला नाही. सबब त्यांची साक्ष अभियोगपक्षाला उपयुक्त ठरत नाही.

**०९.** अशा परीस्थीतीत माझ्या मते आरोपीविरुध्द आरोप संशयाच्या पलिकडे जावून सिध्द होवू शकत नाही. त्यामुळे माझ्या मते आरोपीला संदेहाच्या फायदा देणे न्यायोचित आहे. करीता मी **मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.**

## <u>मुद्दा क्र. ०२ करीता :–</u>

**१०.** वरील विवेचनान्वये आरोपीला समंजस संदेहाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित आहे. करीता मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. आरोपी अर्जुन ऊर्फ जय रमेश पारधी याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड संहिता कलम ३७९ खालील शिक्षापात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे पुर्वीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रुपये १५,०००/– चा प्रत्येकी जामीनाचा जातमुचलका बंधपत्र देण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
JONDHALE SWATI
SURESHRAO
Date: 2024.07.30
10:36:45 +0530

(एस.एस.जोंधळे)

अमळनेर.
दिनांक – ०६.०७.२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, २ रे न्यायालय,
अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव.